Advertisement for Clerk-Typist.docx

# महाराष्ट्र शासन : मोटार वाहन विभाग,

## लिपीक-टंकलेखक पदांवर भरती.

## जाहिरात - २०१३

**(परिवहन आयुक्त कार्यालय,** प्रशासकीय इमारत, ४ था मजला, डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.)

परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिनस्त असलेल्या बृहन्मुंबईबाहेरील प्रादेशिक परिवहन विभागांच्या आस्थापनेवरील गट ‘क’ मधील लिपिक - टंकलेखक (वेतन पट्टा : रूपये ५२००-२०२००; श्रेणी वेतन रू. १९००/-) या संवर्गातील रिक्त पदांच्या सरळसेवा भरतीसाठी या जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांकडून पुढे दिलेल्या विहित दिनांकाच्या मुदतीत अर्ज मागविण्यात येत आहेत.

खेळाडू, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, महिला, पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी यांच्याकरिता असलेले आरक्षण हे समांतर आरक्षण असून ते सामाजिक आरक्षणांतर्गत समाविष्ट आहे.

अपंग आरक्षणांतर्गत भरण्यात यावयाच्या पदांसाठी सामाजिक / समांतर आरक्षण लागू नाही.

अधिक माहिती मिळण्याचे ठिकाण : M.K.C.L. Website (संकेत स्थळ) http://oasis.mkcl.org/rto2013 ही वेबसाईट दिनांक २८.१०.२०१३ पासून कार्यरत होईल. मोटार वाहन विभागाचे संकेतस्थळ http://www.mahatranscom.in आहे.

<u>मोटार वाहन विभागातील बृहन्मुंबईबाहेरील विभागांतील रिक्त पदांचा तपशिल - (दिनांक ३१.१२.२०१३) रोजीचा</u>

| अ. क्र. | प्रादेशिक परिवहन विभाग | समांतर आरक्षणानुसार प्रवर्ग | सामाजिक आरक्षणानुसार प्रवर्गनिहाय पदे | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा | अ.ज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | |
| **१** | **ठाणे** | माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | २ | |
| | | खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | १ | |
| | | प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | १ | |
| | | महिला | १ | १ | - | - | - | - | - | - | ३ | |
| | | अंशकालिन | - | - | - | - | - | - | - | - | १ | |
| | | समांतर आरक्षणाव्यतिरिक्त | २ | २ | १ | - | १ | - | १ | १ | ३ | |
| | | **एकूण** | **३** | **३** | **१** | **०** | **१** | **०** | **१** | **१** | **११** | **२१** |
| **२** | **पनवेल** | माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | १ | १ | |
| | | महिला | १ | १ | - | १ | - | - | - | २ | १ | |
| | | अंशकालिन | - | - | - | - | - | - | - | १ | - | |
| | | समांतर आरक्षणाव्यतिरिक्त | २ | १ | - | - | - | १ | - | ४ | २ | |
| | | **एकूण** | **३** | **२** | **०** | **२** | **०** | **१** | **०** | **८** | **४** | **२०** |
| | | वरिलपैकी अपंगांसाठी आरक्षित | अंध/क्षीणदृष्टी : १ पद | | | | | | | | | |
| | | | श्रवणशक्तीमधील दोष : १ पद | | | | | | | | | |
| | | | चलनवलनविषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु : १ पद | | | | | | | | | |

| अ. क्र. | प्रादेशिक परिवहन विभाग | समांतर आरक्षणानुसार प्रवर्ग | सामाजिक आरक्षणानुसार प्रवर्गनिहाय पदे | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा | अ.ज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | |
| **३** | **पुणे** | माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | १ | ३ | |
| | | खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | १ | |
| | | प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | १ | |
| | | महिला | - | - | - | - | - | - | - | २ | ७ | |
| | | अंशकालिन | - | - | - | - | - | - | - | १ | २ | |
| | | समांतर आरक्षणाव्यतिरिक्त | १ | १ | - | - | - | - | १ | ३ | ९ | |
| | | **एकूण** | **१** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **७** | **२३** | **३३** |
| | | वरिलपैकी अपंगांसाठी आरक्षित | श्रवणशक्तीमधील दोष : १ पद | | | | | | | | | |
| **४** | **कोल्हापूर** | माजी सैनिक | १ | - | - | - | - | - | - | १ | ३ | |
| | | खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | १ | |
| | | प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | १ | |
| | | महिला | २ | १ | - | - | - | - | - | २ | ७ | |
| | | अंशकालिन | १ | - | - | - | - | - | - | १ | २ | |
| | | समांतर आरक्षणाव्यतिरिक्त | २ | २ | - | - | - | - | - | ४ | ८ | |
| | | **एकूण** | **६** | **३** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **८** | **२२** | **३९** |
| | | वरिलपैकी अपंगांसाठी आरक्षित | श्रवणशक्तीमधील दोष : १ पद | | | | | | | | | |
| **५** | **नाशिक** | माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | १ | |
| | | महिला | - | १ | - | - | - | - | - | - | १ | |
| | | अंशकालिन | - | - | - | - | - | - | - | - | १ | |
| | | समांतर आरक्षणाव्यतिरिक्त | - | १ | १ | - | - | - | - | - | २ | |
| | | **एकूण** | **०** | **२** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **५** | **८** |
| **६** | **धुळे** | माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | २ | |
| | | खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | १ | |
| | | प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | १ | |
| | | महिला | १ | - | - | - | - | - | - | १ | ३ | |
| | | अंशकालिन | - | - | - | - | - | - | - | - | १ | |
| | | समांतर आरक्षणाव्यतिरिक्त | १ | - | - | - | - | - | १ | १ | ३ | |
| | | **एकूण** | **२** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **२** | **११** | **१६** |
| | | वरिलपैकी अपंगांसाठी आरक्षित | श्रवणशक्तीमधील दोष : १ पद | | | | | | | | | |
| **७** | **अमरावती** | माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | १ | १ | |
| | | महिला | १ | १ | - | - | - | - | - | १ | ३ | |
| | | अंशकालिन | - | - | - | - | - | - | - | - | १ | |
| | | समांतर आरक्षणाव्यतिरिक्त | २ | १ | १ | - | - | - | १ | २ | ४ | |
| | | **एकूण** | **३** | **२** | **१** | **०** | **०** | **०** | **१** | **४** | **९** | **२०** |
| | | वरिलपैकी अपंगांसाठी आरक्षित | अंध/क्षीणदृष्टी : १ पद | | | | | | | | | |
| | | | श्रवणशक्तीमधील दोष : १ पद | | | | | | | | | |
| | | | चलनवलनविषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु : १ पद | | | | | | | | | |
| **८** | **औरंगाबाद** | महिला | १ | - | - | - | - | - | - | - | १ | |

| अ. क्र. | प्रादेशिक परिवहन विभाग | समांतर आरक्षणानुसार प्रवर्ग | सामाजिक आरक्षणानुसार प्रवर्गनिहाय पदे | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा | अ.ज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | |
| | | समांतर आरक्षणाव्यतिरिक्त | १ | - | - | - | - | - | - | १ | १ | |
| | | **एकूण** | **२** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **२** | **५** |
| **९** | **नांदेड** | महिला | - | १ | - | - | - | - | - | १ | - | |
| | | समांतर आरक्षणाव्यतिरिक्त | १ | १ | - | - | - | - | - | १ | - | |
| | | **एकूण** | **१** | **२** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **२** | **०** | **५** |
| **१०** | **लातूर** | महिला | १ | १ | - | - | - | - | - | - | १ | |
| | | समांतर आरक्षणाव्यतिरिक्त | १ | १ | - | - | - | - | - | - | १ | |
| | | **एकूण** | **२** | **२** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **२** | **६** |
| | | वरिलपैकी अपंगांसाठी आरक्षित | चलनवलनविषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु : १ पद | | | | | | | | | |
| **११** | **नागपूर (शहर)** | माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | २ | |
| | | खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | १ | |
| | | प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | १ | |
| | | महिला | - | - | - | - | १ | - | - | १ | ४ | |
| | | अंशकालिन | - | - | - | - | - | - | - | - | १ | |
| | | समांतर आरक्षणाव्यतिरिक्त | १ | १ | - | १ | १ | - | - | २ | ३ | |
| | | **एकूण** | **१** | **१** | **०** | **१** | **२** | **०** | **०** | **४** | **१२** | **२१** |
| | | वरिलपैकी अपंगांसाठी आरक्षित | अंध/क्षीणदृष्टी : १ पद<br>चलनवलनविषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु : १ पद | | | | | | | | | |
| **१२** | **नागपूर (ग्रामिण)** | माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | १ | - | |
| | | महिला | १ | - | - | - | - | - | - | २ | - | |
| | | अंशकालिन | - | - | - | - | - | - | - | १ | - | |
| | | समांतर आरक्षणाव्यतिरिक्त | २ | १ | १ | - | १ | - | - | ३ | १ | |
| | | **एकूण** | **३** | **१** | **१** | **०** | **१** | **०** | **०** | **७** | **१** | **१४** |
| | | वरिलपैकी अपंगांसाठी आरक्षित | चलनवलनविषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु : १ पद | | | | | | | | | |
| **विभागातील एकूण** | | | अ.जा | अ.ज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | **एकूण** |
| | | | **२७** | **१९** | **४** | **३** | **४** | **१** | **४** | **४४** | **१०२** | **२०८** |

**टिप : (अ) वर दर्शविलेल्या रिक्त पदांच्या एकूण व संवर्गनिहाय/प्रवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी तथा परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील त्यांचा निर्णय अंतिम असेल. समांतर आरक्षणातून महिला / खेळाडू उमेदवार उपलब्ध न झाल्यास ती पदे संबंधित जाती प्रवर्गातून भरण्यात येतील.**

**(ब) वरील सर्व संवर्गात दर्शविण्यात आलेले सामाजिक आणि समांतर आरक्षण हे संबंधित प्रादेशिक परिवहन विभागाच्या प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडून प्राप्त मागणीपत्रानुसार आहे.**

**अटी :**

**अ) वयोमर्यादा :**

**उमेदवाराचे दिनांक २८.१०.२०१३ रोजीचे वय विचारात घेतले जाईल.**

(१) उमेदवाराचे वय दिनांक २८ ऑक्टोबर २०१३ रोजी किमान वय १८ वर्षे पूर्ण व कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी उमेदवारांसाठी ३३ वर्षे व मागासवर्गीयांसाठी ३८ वर्षे अशी राहील.

(२) 'सुशिक्षित बेरोजगारांना आर्थिक सहाय्य' या योजनेअंतर्गत ३ वर्षे काम केलेल्या अंशकालीन प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४६ वर्षे राहील.

(३) सशस्त्र दलात कमीत कमी सहा महिने सलग सेवा करणाऱ्या माजी सैनिकांसाठी विहीत वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील आणि अपंग माजी सैनिकांसाठी ४५ वर्षे ही कमाल वयोमर्यादा राहील. सदरहू सवलत माजी सैनिकांसाठी आरक्षित तसेच अनरक्षित प्रवर्गाकरिता लागू राहील.

(४) अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडूंसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथीलक्षम राहील.

(५) अपंग/प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील.

(६) स्वातंत्र्यसैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी या घटकातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.

**ब) अधिवास :**

अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले विहित नमून्यातील प्रमाणपत्र त्याचेकडे असणे आवश्यक आहे.

**क) शैक्षणिक अर्हता :**

खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता अर्ज सादर करतेवेळी धारण केलेली असणे आवश्यक आहे :

(१) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (एस.एस.सी.) किंवा तत्सम मान्यताप्राप्त शिक्षणमंडळाची परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

(२) उमेदवाराने मराठी टंकलेखनाचा वेग ३० शब्द प्रती मिनिट अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

वर नमूद अर्हता प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या दिनांकास धारण केलेले असले पाहिजे. तथापी, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, स्वातंत्र्यसैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी आणि पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी या घटकातील उमेदवारांना टंकलेखन परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून ६ महिने इतक्या कालावधीची मुदत अनुज्ञेय राहील. तसेच, माजी सैनिक उमेदवारांना टंकलेखन परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून ११ महिने इतक्या कालावधीची मुदत अनुज्ञेय राहील. सदर कालावधीत टंकलेखन अर्हता धारण न केल्यास संबंधित उमेदवारांची सेवा संपुष्टात आणण्यात येईल.

**ड) मागासवर्गीय उमेदवारांसाठी :**

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती / भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास वर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम, २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९ जानेवारी, २००४ पासून अंमलात आणला आहे. या अधिनियमातील नियम क्रमांक ४(२)(दोन) खालील परंतुकान्वये उन्नत व प्रगत (क्रिमी लेअर) तत्व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता सर्व प्रवर्गांना लागू असेल अशी तरतूद केलेली आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमी लेयर)

तत्व वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग यांना लागू आहे. त्यानुसार या प्रवर्गातील उमेदवारांनी जात व अद्ययावत उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेयर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**इ) समांतर आरक्षणासाठी :**

(१) उमेदवार माजी सैनिक असल्यास त्यांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केल्याच्या प्रमाणपत्राची छायांकित /साक्षांकित प्रत प्रथम कागदपत्रे पडताळणीच्या वेळी व नंतर नियुक्तीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

(२) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुंसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक : राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे, दिनांक ३०.०४.२००५ व शासन निर्णय दिनांक ०६.०५.२००८ मधील तरतूदीनुसार राहील. वरिल शासन निर्णयानुसार खेळाडू प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्यस्तरावरील (शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट अ मधील नमूद) खेळाचे व प्राधिकृत केलेल्या खेळाचे असावे.

(३) प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचे प्रकल्पग्रस्त असल्याबाबतचे शासकीय नोकरी मिळण्यासाठी विहित केलेले प्रमाणपत्र प्रथम कागदपत्रे पडताळणीच्या वेळी व नंतर नियुक्तीचेवेळी सादर करणे आवश्यक आहे.

(४) भूकंपग्रस्त उमेदवारांनी जिल्हाधिकारी यांचे भूकंपग्रस्त असल्याबाबतचे शासकीय नोकरी मिळण्यासाठी विहित केलेले प्रमाणपत्र प्रथम कागदपत्रे पडताळणीच्या वेळी व नंतर नियुक्तीचेवेळी सादर करणे आवश्यक आहे.

(५) खुल्या प्रवर्गातील महिलांनी महिला आरक्षणाच्या सवलतीसाठी उन्नत व्यक्ती/गट (क्रिमी लेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे दिनांक ०१.०४.२०१३ ते लेखी परिक्षेचा कालावधीचा दिनांक या कालावधीत प्राप्त झालेले (नॉन क्रिमी लेअर) प्रमाणपत्र / नूतनीकरण प्रमाणपत्र प्रथम कागदपत्रे पडताळणीच्या वेळी व नंतर नियुक्तीचेवेळी सादर करणे आवश्यक आहे.

(६) 'सुशिक्षित बेरोजगारांना आर्थिक सहाय्य' या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयांमध्ये तीन वर्षे काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या तीन वर्षाच्या अनुभवाची नोंद असलेल्या पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्रे, कागदपत्रे पडताळणीच्या वेळी व नंतर नियुक्तीचेवेळी सादर करणे आवश्यक आहे.

(७) अपंग उमेदवाराने अपंगत्वाचे किमान प्रमाण ४० % असल्याबाबतचे स्थायी वैद्यकिय मंडळाचे प्रमाणपत्र व याबाबतच्या कागदपत्रांच्या प्रथम कागदपत्रे पडताळणीच्या वेळी व नंतर नियुक्तीचेवेळी सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्रावर उमेदवाराचा स्पष्ट फोटो आवश्यक आहे.

**ई) संगणक अर्हता :**

उमेदवाराने राज्य शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाचा शासन निर्णय क्र. मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४.०२.२०१३ मध्ये नमूद केल्यानुसार आवश्यक संगणक अर्हता वा शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/ ३९, दिनांक १९.०३.२००३ मधील तरतूदीनुसार (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक MSCIT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा (ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत परिक्षा प्रमाणपत्र यापैकी एक प्रमाणपत्र तसेच माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाद्वारे वेळोवेळी विहित केलेली संगणक अर्हता त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांची सेवा तात्काळ संपुष्टात आणली जाईल.

**फ) सर्वसामान्य अटी :**

(१) मोटार वाहन विभागातील लिपिक-टंकलेखक पदासाठी सरळसेवा भरती प्रक्रियेची सविस्तर जाहिरात http://oasis.mkcl.org/rto2013 संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर संकेतस्थळाला वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेबाबतची अद्ययावत माहिती उपलब्ध करून घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. लेखी परिक्षा, प्रवेशपत्र, निकाल, कागदपत्रे छाननी व इतर विविध सूचना या संकेतस्थळावरून प्रसिध्द केल्या जातील. (याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.)

(२) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार आहेत. अर्ज करतेवेळी शैक्षणिक कागदपत्रे अथवा अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. अर्ज भरताना काही त्रुटी राहिल्यास अथवा अपूर्ण माहिती दिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहिल. संकेतस्थळावर नमूद पध्दतीनेच प्रक्रिया शुल्क स्विकारण्यात येईल. ही माहिती नंतर बदलता येणार नाही.

(३) उमेदवाराची ऑनलाईन परिक्षा ही उमेदवाराची कोणत्याही कागदपत्राची पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्याने केवळ या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवाराची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षणनिहाय अंतिम निवड केली जाईल.

(४) विहित अर्हता व वयोमर्यादा कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही. जाहिरातीत नमूद दिनांकास विहित अर्हता व वयोमर्यादा नसलेल्या उमेदवारांनी अर्ज करू नयेत.

(५) अर्जामध्ये नमूद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळल्यास संबंधित उमेदवार दंडात्मक कारवाईस पात्र राहील. उमेदवार भारतीय दंड विधान संहिताचे कलम ११९ व २०० (२) प्रमाणे कारवाईस पात्र राहील.

(६) निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यातील वाद व तक्रारीबाबतचा अंतिम निर्णय घ्यायचा अधिकार **परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई** यांचा असेल.

(७) सर्व प्रादेशिक परिवहन विभागांसाठी एकाच दिवशी एकाच वेळी ऑनलाईन परिक्षा घेण्यात येणार आहे. सबब अर्जदारास एकाच विभागातील पदासाठी अर्ज सादर करता येईल. या जाहिरातीत नमूद केलेले शासन निर्णय / परिपत्रके याबाबतची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(८) परिक्षेचा संकेतांक क्रमांक, वेळ व दिनांक इ. तपशिल पात्र उमेदवारांना MKCLच्या उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध होईल. परिक्षेचे वेळापत्रक संकेतस्थळावरून प्राप्त करून घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहिल. उमेदवारांच्या ऑनलाईन परिक्षेचे ठिकाण जिल्ह्याच्या मुख्यालयी राहील. उमेदवारास परिक्षा केंद्रावर स्वखर्चाने यावे लागेल.

(९) गुणानुक्रमे पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांच्या पडताळणीचे ठिकाणही संकेतस्थळावरून प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारांनी नेमून दिलेल्या दिनांकास स्वतः उपस्थित राहणे अनिवार्य राहील. प्रमाणपत्र मिळविण्याकरिता सादर केलेल्या अर्जांच्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. छाननीअंती प्रमाणपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास, माहिती खोटी आढळल्यास अथवा एखादे प्रमाणपत्र सादर न केल्यास उमेदवाराला त्याचवेळी पुढील प्रक्रियेसाठी अपात्र केले जाईल व त्याची निवड रद्द होऊ शकेल. उमेदवारांनी आवश्यक त्या मूळ प्रमाणपत्रांसह साक्षांकित प्रतींचा एक संच सादर करणे आवश्यक आहे. (साक्षांकन हे राज्य किंवा केंद्र शासनाचे राजपत्रित अधिकारी / सर्व मान्यताप्राप्त महाविद्यालयांचे किंवा माध्यमिक शाळांचे प्राचार्य / मुख्याधापक किंवा राज्य शासनाने प्राधिकृत अधिकाऱ्यांनीच केलेले असावे.)

(१०) जिल्हा रोजगार आणि स्वयंरोजगार कार्यालयात नावनोंदणी केलेल्या उमेदवारांनी लिपीक-टंकलेखक पदासाठी विहित नमून्यात रितसर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. सदर जाहिरात जिल्हा रोजगार आणि स्वयंरोजगार विभागाच्या http://ese.mah.nic.in या संकेतस्थळावरदेखील उपलब्ध आहे.

(११) विहित वयोमर्यादेतील इच्छुक शासकीय / निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने भरावेत व अशा परवानगीची प्रत प्रथम कागदपत्रांच्या पडताळणीच्यावेळी आणि नियुक्तीच्या वेळी सादर करावी लागतील. अशा रितीने केलेल्या अर्जासाठीदेखील अर्ज करण्याची अंतिम तारीख शिथिल केली जाणार नाही.

(१२) उमेदवारांची निवड विशिष्ट मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या पदासाठी झाली असल्यास आणि त्या उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, अशा उमेदवारांनी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२.१२.२०११ मधील तरतूदीनुसार, आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांत जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करून घेणे आवश्यक राहिल. त्याने नियुक्ती स्विकारताच जात वैधता पडताळणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोचपावतीची साक्षांकित प्रत विभाग प्रमुखांकडे सादर करावी. उमेदवाराचे जात वैधता प्रमाणपत्र जात पडताळणी समितीने अवैध ठरवले तर त्यांचे नियुक्ती आदेश तात्काळ रद्द करण्यात येतील.

**महत्वाची सूचना** : जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी कोणकोणती कागदपत्रे सादर करावी लागतील याचा तपशिल दर्शविणारी 'परिशिष्ट-अ', 'परिशिष्ट-ब' आणि 'परिशिष्ट-क' या जाहिरातीसोबत जोडण्यात आली आहेत.

(१३) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ अनुसार, नियुक्तीसाठी निवड झालेल्या विवाहित उमेदवारांनी विहित नमून्यातील प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी व नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. या प्रमाणपत्राचा विहित नमूना यासोबत जोडण्यात आला आहे.

(१४) अपंग प्रवर्गातील उमेदवारास ऑनलाईन परिक्षेच्या वेळी लेखनिकाची मदत आवश्यक असल्यास अर्ज करतेवेळीच मागणी करावी.

(१५) जाहिरातीत दर्शविलेल्या रिक्त पदांच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण याबाबत बदल करणे, परिक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे स्वतःकडे राखून ठेवत आहे. याबाबत भविष्यात कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

(१६) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती / अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी / नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. तसेच, शासकीय सेवेत असल्यास बडतर्फ करण्यात येईल.

(१७) एखाद्या अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर यंत्रणेवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

**ग) परिक्षेचे स्वरूप :**

(१) लिपीक-टंकलेखक पदासाठी एकूण <u>१०० गुणांची</u> ऑनलाईन परिक्षा घेण्यात येईल.

(२) परिक्षेचा अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जासमान असेल. लेखी परिक्षेसाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयांवर वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी प्रश्न असतील.

(३) सर्व विभागांसाठी ऑनलाईन परिक्षा एकाच दिवशी घेण्यात येईल.

(४) निवड प्रक्रियेमध्ये पात्र ठरण्यासाठी उमेदवारास किमान ४५ टक्के गुण मिळणे अनिवार्य आहे. यापेक्षा कमी गुण मिळालेले उमेदवार पुढील प्रक्रियेतून बाद होतील.

(५) गुणवत्ता यादीसाठी पात्र ठरलेले उमेदवार कागदपत्रांच्या पडताळणीच्या दिनांकास गैरहजर राहिल्यास उमेदवार पुढील प्रक्रियेतून बाद होतील.

(६) **लेखी परिक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्यामुळे त्याचा सराव होण्यासाठी, MKCL च्या संकेतस्थळावर मॉक टेस्ट (Mock Test) उपलब्ध करून दिली जाईल. कृपया त्यावरती ऑनलाईन परिक्षा पध्दतीचा सराव करावा. परिक्षेवेळी व तद्नंतर ऑनलाईन परिक्षा पध्दतीबाबत कोणताही आक्षेप घेता येणार नाही.**

**ह) निवड प्रक्रिया व नियुक्ती :**

(१) ऑनलाईन परिक्षेनंतर आदर्श उत्तरपत्रिका (Model Answer Paper) दुसऱ्या दिवशी MKCL च्या उपरोक्त संकेतस्थळावर जाहिर करण्यात येईल. सदर उत्तरपत्रिकेबाबत काही आक्षेप असल्यास उमेदवारांनी उत्तरपत्रिका जाहिर झाल्यानंतर ०७ दिवसांच्या आत लेखी निवेदन सबळ पुराव्यासह MKCL कडे उपरोक्त संकेतस्थळावर पाठवावे. तद्नंतर प्राप्त होणाऱ्या निवेदनांचा विचार करण्यात येणार नाही.

(२) ऑनलाईन परिक्षेस बसलेल्या सर्व उमेदवारांचे परिक्षेत मिळालेले गुण संकेतस्थळावर जाहिर केले जातील.

(३) या एकत्रित यादीतून सामाजिक / समांतर आरक्षण व नियुक्तीसाठी उपलब्ध पदे विचारात घेऊन त्याप्रमाणे कागदपत्रे पडताळणीसाठी बोलविण्यात येणाऱ्या उमेदवारांची यादी M.K.C.L. च्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल. अशा उमेदवारांनी संकेतस्थळावर दिलेल्या सूचनांनुसार त्यांच्या कागदपत्र छाननीसाठी ठरवून दिलेल्या दिनांकास, वेळेवर व ठरवून दिलेल्या ठिकाणी मूळ कागदपत्रे व साक्षांकित प्रतींसह उपस्थित राहणे अनिवार्य राहील. उमेदवार सदर दिवशी, वेळेत व ठिकाणी सदर उमेदवार कागदपत्र छाननीसाठी अनुपस्थित राहिल्यास, अपुरी कागदपत्रे सादर केल्यास किंवा प्रमाणपत्र प्राप्त करण्याबाबतची पावती सादर केल्यास त्यास अपात्र ठरविला जाईल. याबाबत कोणतीही विनंती / तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच, कागदपत्रे पडताळणीच्या कालावधीनंतरच्या कालावधीत कोणतीही मागावून सादर केलेली प्रमाणपत्रे ग्राह्य धरली जाणार नाहीत. यावेळी सादर केलेली कागदपत्रे ही जाहिरातीत नमूद केलेल्या दिनांकापूर्वीचीच असणे आवश्यक आहे.

(४) वरिलप्रमाणे उमेदवारांच्या कागदपत्रांच्या छाननीनंतर पात्र ठरलेल्या उमेदवारांचाच समावेश अंतिम यादीत करता येईल.

(५) ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दिनांक २७.०६.२००८ प्रमाणे खालील निकषांवर क्रमवार लावण्यात येईल :-

१. अर्ज सादर करण्याच्या दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार; त्यानंतर
२. मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत प्रथम अनुसूचित जमाती मधील नंतर अनुसूचित जाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती, भटक्या जमाती जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जमाती), भटक्या जमाती (धनगर व तत्सम), इतर मागास वर्ग या क्रमाने; त्यानंतर

३. शारिरीक दृष्ट्या अपंग असलेले उमेदवार ; त्यानंतर
४. माजी सैनिक असलेले उमेदवार ; त्यानंतर
५. स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य असलेले उमेदवार ; त्यानंतर
६. वय (वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारांचा क्रम वरती लागेल.)
वरिल प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.

(६) अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्तीच्या वेळी नियुक्ती करणाऱ्या अधिकाऱ्याकडे सर्व मूळ प्रमाणपत्रे वैधता तपासणीसाठी सादर करणे अनिवार्य आहे.
(७) निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना लिपीक-टंकलेखक पदासाठी विहित करण्यात आलेली सेवाप्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
(८) अपंग आरक्षणाचा फायदा घेऊन सदर प्रवर्गात निवड झालेल्या अपंग उमेदवाराला नियुक्तीपूर्वी वैद्यकीय तपासणी करुन घ्यावी लागेल.

**ळ) अर्ज करण्याची पध्दत :**

(१) अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाईन पध्दतीन भरलेले विहित अर्जच स्विकारले जातील. **अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची विशेष नोंद घ्यावी.**

(२) ऑनलाईन अर्ज http://oasis.mkcl.org/rto2013 या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याबाबतच्या सविस्तर सूचनाही संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

(३) आवश्यक माहिती भरल्यानंतर नोंदणी झाल्यावर संगणक प्रणाली उमेदवाराचा लॉग इन आयडी आणि पासवर्ड निर्माण करून स्क्रीनवर दाखवेल. त्याची प्रिंट काढण्याची सुविधाही उपलब्ध आहे.

(४) तद्‌नंतर उमेदवाराने चलन प्रिंट करावे. या प्रिंट केलेल्या चलनावर नमूद करण्यात आलेले परिक्षा शुल्क केवळ स्टेट बँक ऑफ इंडियाच्या (State Bank Of India) कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी तसेच खालील वेळापत्रकात नमूद केलेल्या मुदतीत भरणे आवश्यक राहिल व त्याची एक प्रत उमेदवाराने स्वतःकडे ठेवावी.

(५) बँकेत परिक्षा शुल्क भरल्यानंतर उमेदवाराने “अर्ज भरा’ या लिंकवर क्लिक करून आपला उर्वरित अर्ज पूर्ण करावा. अर्ज भरताना उमेदवाराने स्वतःचा पासपोर्ट आकारातील फोटो व सही अपलोड करणे आवश्यक आहे. माहिती पूर्ण भरल्यानंतर उमेदवाराने अर्जाची प्रिंट स्वतः काढावी व कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावी.

(६) वरिल सर्व प्रक्रिया (उमेदवार नोंदणी, बँकेत परिक्षा शुल्क भरणा व उर्वरित अर्ज भरणे) पूर्ण केल्यानंतरच उमेदवार परिक्षा देण्यास पात्र होईल.

(७) ऑनलाईन परिक्षेचे प्रवेशपत्र संकेतस्थळावरून प्राप्त करून घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

(८) M.K.C.L. च्या अधिकृत A.L.C. केंद्रावरील उपलब्ध दूरध्वनी क्रमांकावर किंवा संकेतस्थळावरील फिडबॅकच्या सुविधेद्वारे योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध होईल.

(९) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरताना स्वतःचा मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी अचूक भरावा. ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ईमेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा / अपूर्ण असल्यास, तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रियेदरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणाऱ्या सूचना, संदेश व माहिती

उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराचीच राहील. तसेच, ईमेल आयडी व मोबाईल संदेशवहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना M.K.C.L. वा परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई जबाबदार असणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन परिक्षेची रूपरेषा / वेळापत्रक / परिक्षा केंद्र / बैठक क्रमांक इ. भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. यासंबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**क्ष) परिक्षेसाठी ऑनलाईन अर्ज आणि शुल्क भरण्याच्या कार्यवाहीचे वेळापत्रक :**

| अ.क्र. | कार्यक्रम | कालावधी - दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १ | ऑनलाईन अर्ज भरणे आणि नोंदणी. | २८.१०.२०१३ | ११.११.२०१३ |
| २ | स्टेट बँक ऑफ इंडियाच्या (State Bank Of India) शाखेमध्ये, संगणकीय चलन, क्रेडीट कार्ड / डेबीट कार्ड आणि नेट बँकिंग याद्वारे परिक्षा शुल्क जमा करण्याचा कालावधी. | २८.१०.२०१३ | १३.११.२०१३ |
| ३ | स्टेट बँक ऑफ इंडियाच्या (State Bank Of India) शाखेमध्ये, दिनांक १३.११.२०१३ पर्यंत भरती प्रक्रिया शुल्क जमा केलेल्या उमेदवारांसाठी उर्वरित ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी. | दिनांक १६.११.२०१३ रोजी सायंकाळी ०५.४५ वाजेपर्यंत. | |

**ज्ञ) परिक्षा शुल्क :** या भरतीप्रक्रियेकरीता पुढीलप्रमाणे शुल्क आकारले जाईल :-

(१) खुला प्रवर्ग : रूपये ४००/- (रूपये चारशे फक्त)
(२) मागास प्रवर्ग : रूपये २००/- (रूपये दोनशे फक्त)
(३) माजी सैनिक : अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागू नाही.

सदर सेवाशुल्क हे 'ना परतावा' राहील. कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही.

**विशेष सूचना :**

(१) अर्जदार उमेदवारांनी **नियुक्तीचा प्रादेशिक विभाग निवडतांना योग्य ती खबरदारी घ्यावी.** नियुक्तीचा विभाग एकच दर्शवावा लागेल व त्याच विभागातून परिक्षा द्यावी लागेल. त्यात पुन्हा बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी. मोटार वाहन विभागात नियुक्ती जरी उमेदवाराने नमूद केल्याप्रमाणे प्रादेशिक परिवहन विभागाच्या स्तरावर द्यावयाची असली तरी सदर पदासाठीची ऑनलाईन परिक्षा सर्व संबंधित जिल्हा मुख्यालयी घेण्यात येईल.

(२) भरती प्रक्रिया सुरू असतांना भरती प्रक्रियेतील कोणत्याही प्रकारची माहिती, भरती प्रक्रिया पूर्ण होऊन उमेदवारांच्या नियुक्त्या होईपर्यंत कोणालाही उपलब्ध करून दिली जाणार नाही.

**परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**प्रत**, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र यांना (संबंधित विभागाचे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेमार्फत) अग्रेषित.

## "परिशिष्ट-अ"

## <u>अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी सादर करावयाची कागदपत्रे</u>

| | | | |
|---|---|---|---|
| | अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समितीने विहित केलेल्या नमून्यातील अर्ज. | | मूळ प्रत व साक्षांकित प्रत |
| १. | अर्जदाराचे किंवा उमेदवाराचे मुळ जाती प्रमाणपत्र व साक्षांकित प्रत | | (अत्यंत आवश्यक) |
| २. | प्राथमिक शाळा प्रवेशाच्या नोंदवहीचा गोषवारा. | | साक्षांकित प्रती व त्यावर नातेसंबंध लिहावा. |
| | (अ) | संबंधित अर्जदार / उमेदवार. | |
| | (ब) | अर्जदाराचे वडील, काका. | |
| | (क) | आजोबा, आजी व आजोबाचे भाऊ, इत्यादी. | |
| ३. | प्राथमिक / माध्यमिक शाळा सोडल्याचे दाखले (प्राथमिक दाखला आवश्यक). | | साक्षांकित प्रती व त्यावर नातेसंबंध लिहावा. |
| | (अ) | संबंधित अर्जदार / उमेदवार. | |
| | (ब) | अर्जदाराचे वडील, काका. | |
| | (क) | आजोबा, आजी व आजोबाचे भाऊ, इत्यादी. | |
| ४. | जन्म नोंदवहीचा उतारा. | | साक्षांकित प्रती व त्यावर नातेसंबंध लिहावा. |
| | (अ) | संबंधित अर्जदार / उमेदवार. | |
| | (ब) | अर्जदाराचे वडील, काका. | |
| | (क) | आजोबा, आजी व आजोबाचे भाऊ, इत्यादी. | |
| ५. | वडील / काका सेवेत असतील तर जात नोंदीबाबत सेवापुस्तकातील पहिल्या पानाच्या उताराची साक्षांकित प्रत. | | |
| ६. | वडील / काका यांचे जात प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत. | | |
| ७. | तपासणी समितीकडून रक्तनात्यातील ज्या नातेवाईकांचे दाव्यात वैधता मिळालेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत त्या नातेवाईकांच्या मूळ शपथपत्रासह (नातेसंबंधात). | | |
| ८. | यापूर्वी उमेदवाराच्या रक्तसंबंधातील नातेवाईकांच्या जातीचा दावा न्यायालयाकडून वैध/अवैध ठरविला असल्यास, त्याबाबतची माहिती. | | |
| ९. | अर्जदार/उमेदवाराच्या रक्तनात्यातील जसे वडील/आजोबा/पणजोबा अशा नातेवाईकांचा दिनांक ०६.०९.१९५० पूर्वीचा वास्तवाचा जातीच्या पुराव्यासंबंधाने त्या काळातील जमीन महसुली अभिलेख, जसे अधिकार अभिलेख पंजी. ७/१२, ८-अ, जमाबंदी, खसरी, भूमी अभिलेख व खरेदी/विक्री अभिलेख इत्यादींच्या साक्षांकित प्रती (ज्यामध्ये जातीची नोंद आहे). | | |
| १०. | जाती संबंधीचा त्याच्या दाव्याच्या पृष्ठ्यर्थ असलेले कोणतेही इतर संबध्द दस्तऐवज. | | |
| | वरिल व्यतिरिक्त अधिक पुरावे आवश्यक वाटल्यास, समितीस ती कागदपत्र मागण्याची मुभा राहील. | | |

## “परिशिष्ट-ब”

## अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग

## जाती प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी सादर करावयाची कागदपत्रे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | | जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीने विहित केलेल्या नमून्यातील अर्ज :<br>**सेवा (नियुक्ती / पदोन्नतीसाठी)** | मूळ प्रत व साक्षांकित प्रत |
| २. | **(अ)** | **प्राथमिक महत्वाचे पुरावे :** | |
| | अ-१,२ | उमेदवाराचा जातीचा दाखला | मूळ प्रत व साक्षांकित प्रत |
| | अ-३ | उमेदवाराचा जन्माचा दाखला | साक्षांकित प्रती (२) |
| | अ-४ | उमेदवाराचे प्राथमिक शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र / शाळा नोंदवहीचा उतारा | साक्षांकित प्रती (२) |
| | अ-५ | उमेदवाराच्या वडिलांचे प्राथमिक शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र / शाळा नोंदवहीचा उतारा | साक्षांकित प्रती (२) |
| | अ-६ | आजोबा, मोठे काका/मोठ्या आत्याचे शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा शाळा नोंदवहीचा उतारा | साक्षांकित प्रती (२) |
| | अ-७ | अर्जासोबतच्या विहित नमून्यातील मूळ शपथपत्र (रूपये १००/- च्या स्टँपपेपरवर) | मूळ प्रत व साक्षांकित प्रत |
| ३. | **(ब)** | **दुय्यम महत्वाचे पुरावे :**(प्राथमिक महत्वाचे पुरावे उपलब्ध नसले तरच दुय्यम पुरावे जोडावेत.) | |
| | ब-१ | वडील/काका/आत्या/आजोबा अशिक्षित असल्यास त्यांचा जन्म/मृत्यू नोंदवहीचा उतारा (यालाच गाव नमूना-१४ असे म्हणतात व हा दाखला तहसिलदारांकडे मिळतो. मराठवाड्यात याला कोटवारबुक म्हणतात.)<br>**किंवा**<br>वरिल कागदपत्रांमध्ये जातीचा उल्लेख नसल्यास महसूली दस्तऐवज, जुने खरेदी/विक्री दस्त (Sale Deed) ज्यात जातीचा उल्लेख आहे. | साक्षांकित प्रती |
| | ब-२ | अर्जदाराच्या जात प्रमाणपत्राच्या दाव्यापुष्ट्यर्थ, अन्य कोणतेही संबंधित पुरावे/दस्तऐवज | साक्षांकित प्रती |
| | ब-३ | वरिल प्राथमिक व दुय्यम पुरावे उपलब्ध नसल्यास इतर दस्तऐवज | साक्षांकित प्रती |
| ४. | | **महाराष्ट्राचे रहिवासी असल्याचा पुरावा.** | मूळ प्रत व साक्षांकित प्रत |
| | | अनुसूचित जातीचे उमेदवार असल्यास, दिनांक १०.०८.१९५० च्या पूर्वीचा | |
| | | विमुक्त जाती व भटक्या जमातीचे उमेदवार असल्यास, दिनांक २१.०११.१९६१ पूर्वीचा | |
| | | इतर मागास वर्ग, विशेष मागास प्रवर्गाचे उमेदवार असल्यास, दिनांक १३.१०.१९६७ पूर्वीचा | |

## “परिशिष्ट-क”

**सेवा (नियुक्ती / पदोन्नतीसाठी)**
**(रूपये १००/- च्या स्टँप पेपरवर)**
**जाती प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी केलेल्या**
**अर्जासोबत सादर करावयाच्या शपथपत्राचा नमूना**

मी, ------------------------------------------------------------------ वय -------- वर्ष,----- व्यवसाय - ------------ राहणार ------------------------------------------------ आज दिनांक ------------- रोजी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की, मला उप जिल्हाधिकारी / उप विभागीय अधिकारी ------------------ यांनी दिनांक --- --------------- रोजी दिलेला ----------------------------------------------- जातीचा दाखला, क्रमांक ------------ -च्या प्रमाणपत्र पडताळणीसाठी मी अर्ज केलेला आहे.

मला राखीव सेवांतर्गत नियुक्ती झाल्याने वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

अर्जासोबत जोडलेली सर्व कागदपत्रे व पुरावे मी संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्राप्त करवून घेतलेली असून ती कागदपत्रे खरी आणि योग्य मार्गाने मिळविलेली आहेत. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड / दुरूस्ती / बदल केलेला नाही.

* माझ्या रक्त नातेसंबंधातील वडीलांच्या बाजूकडील कोणत्याही नातेवाईकाच्या जातीचे प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून कधीही अवैध ठरलेले नाही.

* माझे ज्या नातेवाईकांचे जात प्रमाणपत्र वैध / अवैध झाले आहे त्यासंबंधीचे खालील दस्तऐवजांची साक्षांकित प्रत सोबत जोडली आहे.

| अ.क्र. | जात प्रमाणपत्र वैध / अवैध झाले त्या व्यक्तीचे नाव | माझ्याशी नाते | जात प्रमाणपत्र वैध / अवैध |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

माझी वंशावळी खालीलप्रमाणे आहे :-

उपरोक्त पैकी कोणतेही कागदपत्र खोटी अथवा बनावट आढळल्यास मी त्यास जबाबदार असून त्यासाठी भारतीय दंड विधान कायद्यानुसार लागू होणाऱ्या शिक्षेस मी पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे. मी सत्य प्रतिज्ञेवर वर नमूद केलेली सर्व माहिती सत्य व खरी आहे.

ठिकाण :
दिनांक :

प्रतिज्ञा करणाऱ्याची (अर्जदाराची) सही
अर्जदाराचे संपूर्ण नाव

* लागू नसल्यास खोडावे.

## महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.(१७/२०००)/बारा, दिनांक ०१ जुलै २००५.

### प्रतिज्ञापनाची नमुना-अ

### प्रतिज्ञापन

(नियम ४ पहा)

मी श्री./श्रीमती/कुमारी.......................................................................................................

श्री. ..................................................................... यांचा / यांची / मुलगा / मुलगी / पत्नी, वय ............वर्षे, राहणार ......................................... यांद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो / करते की,

(१) मी .......................................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला .... (संख्या) (अक्षरी ............ ) इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ....... (अक्षरी ............) आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा.)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे, या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण : मुंबई.

दिनांक :    /    /२०१३.

उमेदवाराचे नाव व सही (दिनांकासह).